# शहीद पोलिसांना अभिवादन

## बंदुकीच्या फैरी झाडून श्रद्धांजली



**■ नंदुरबार । दि.२१ । प्रतिनिधी**

देशासाठीं बलिदान दिलेल्या सर्व शहिद जवानांना आज पोलीस स्मृती दिनानिमित्त अभिवादन करून बंदुकीच्या फैरी झाडत मानवंदना दिली.

देशासाठी बलिदान दिलेल्या पोलीसांचा स्मृतीस अभिवादन करण्यासाठी पोलीस दलातर्फे पोलीस स्मृती दिनाचे औचित्य साधून देशातील २९२ शहिदांना अभिवादन करण्यात आले. यात महाराष्ट्रातील ४० व गडचिरोली येथील १५ शहिदांना अभिवादन करण्यात आले. पोलीस अधिक्षक कार्यालय नंदुरबार येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ.राजेंद्र भारूड, प्रमुख सत्र न्यायाधिश प्रमोद तरारे, जिल्हा पोलीस अधिक्षक महेंद्र पंडीत, अपर पोलीस अधिक्षक चंद्राकंत गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथींनी शोक संदेशाचे वाचून केले. त्यानंतर विरगती प्राप्त झालेल्या शहिदांचे नांव घेवून त्यांना अभिवादन केले. यावेळी पोलीसांनी बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना दिली. यावेळी स्थानिक गुन्हा अन्वेशन शाखेचे पोलीस निरीक्षक किशोर नवले, बाळासाहेब गायधनी, आरपीआयचे देवनाथ राजपूत, सहायक पोलीस निरीक्षक संदिप पाटील, पोलीस निरीक्षक कमलाकर चौधरी आदी उपस्थित होते.